**MHNG160005432021**

दाखल दिनांक – २७.०७.२०२१
नोंद दिनांक – २७.०७.२०२१
निकाल दिनांक – ०२.०५.२०२६
कालावधी – वर्ष महिने दिवस
०४ ०९ ०६

**मौदा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, मौदा**

( पिठासीन अधिकारी एन.के. वानखडे )

**सं.फौ.ख. क्र.३१८/२०२१**
**निशाणी क्र.१८.**
[गुन्हा रजि. क्र. ७२/२०२१
अरोली पोलिस ठाणे, जि. नागपूर]

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस ठाणे अधिकारी,<br>अरोली पोलिस ठाणे, ता. मौदा, जि. नागपूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | **श्री. एस. जी. इंगळे**, सहा. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | **राहुल बाळकृष्ण बोंदरे,**<br>व.व. ३६, धंदा – मजुरी,<br>रा. धर्मापुरी, ता. मौदा, जि. नागपूर. |
| **आरोपी तर्फे विधिज्ञ** | श्रीमती. आर. यु. ढोणे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | २८.०५.२०२१ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २८.०५.२०२१ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | २७.०७.२०२१ |

| | |
|---|---|
| दोषारोप ठेवलेची तारीख | १२.१२.२०२५ |
| पुरावा सुरु झालेची तारीख | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय करीता ठेवलेली तारीख | – |
| न्यायनिर्णय तारीख | ०२.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | – |

## आरोपीविषयी माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामिनावर सुटलेची तारीख | आरोपीत गुन्हा | निर्दोष किंवा शिक्षा | ठोठावण्यात आलेली शिक्षा | खटल्या दरम्यान आरोपी बंदिवासातअसल्याचा कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | **राकेश बाळकृष्ण बोंदरे** | सुचनापत्रावर सोडले | – | म.दा.का.कलम ६५(ई) | निर्दोष | – | – |

## अभियोग/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### (अ) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार –

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | विकास हरिचंद्र भिवगडे | १४ | पंच साक्षीदार |

### (ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक

### (क) न्यायालय तर्फे साक्षीदार – निरंक

## अभियोग/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांक

### (अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी –

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १५ | पंच सा.क्र.१ ची समंसवरील सही. |
| २. | १६ | पंच सा.क्र.१ ची घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील सही. |

### (ब) बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

### (क) न्यायालय पक्षातर्फे निशाणी – निरंक

### (ड) भौतीक वस्तु – निरंक

## न्यायनिर्णय

(आज दिनांक ०२.०५.२०२६ रोजी घोषित)

१. **आरोपी – राकेश बाळकृष्ण बोंदरे**, याचेविरुध्द प्रस्तुतचा खटला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम मधील कलम ६५ (ई) नुसार चालवण्यात आला.

२. आरोपीविरूद्ध नि.क्र.१३ लगत म.दा. अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे दोषारोप निश्चित केले.

३. सदर प्रकरणात आरोपीला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम मधील कलम ६५(ई) मधील गुन्ह्याचा मजकूर त्याच्या बोलीभाषेत वाचून दाखवण्यात आला असता, तो आरोपीने कबूल केला नाही. ज्यावरुन अभियोग पक्षाने सदर प्रकरणात पंच साक्षीदार क्र.१ – विकास हरिचंद्र भिवगडे (निशाणी क्र.१४) यांची साक्ष सादर केली.

४. अभियोगपक्षाने घेतलेल्या पुराव्यामधे आरोपीविरूद्ध गुन्ह्यात गोवण्यासारखा

मजकूर अभिलेखावर न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे बयान नोंदविण्यात आले नाही.

**५.** अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकून व अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर माझे विवेचनाकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले, त्या कामी कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविले –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि. २८.०५.२०२१ रोजी रात्री ०९.०० ते ०९.३० वाजताचे दरम्यान मौजा धर्मापुरी, नवरगाव रोड, ता. मौदा येथे आरोपी हा विनापरवाना बेकायदेशिररीत्या १० लिटर मोहाफुल हाथभट्टीची गावठी दारूची विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असताना मिळून आला ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ साठी** :

**६.** अभिलेखावर आलेल्या मौखिक व कागदोपत्री पुराव्याचे मुल्यांकन करण्यापूर्वी इथे ही बाब नमूद करणे न्यायोचित ठरेल की, प्रचलित न्यायिक तत्व प्रणालीनुसार आरोपीचे कृत्य शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अभियोग पक्षाची असते. सदरची जबाबदारी अभियोग पक्षाने बचावातील त्रृटी, विसंगती व खोटेपणाचा आधार न घेता सबळ विश्वासार्ह तोंडी व कागदोपत्री पुराव्याने निसंशयपणे व निर्विवादीतपणे

सिध्द करावयाचे असते. अभियोग पक्ष स्वत: ही जबाबदारी पार पाडत नाही तोपर्यंत आरोपी हा कायद्याच्या कक्षेत निष्पाप समजला जातो. आरोपीच्या बचावातील कमकुवतपणाचा फायदा अभियोग पक्षास घेता येणार नाही. जरी आरोपीने आपला बचाव निसंशयरित्या शाबीत केला नाही तरी त्याकारणावरून त्यास शिक्षा देता येणार नाही. आरोपी आपला बचाव अशक्यतेवर दाखवून देऊ शकतो. जर, अभियोग पक्षाच्या खटल्याबाबत संशय निर्माण झाला तर संशयाचा फायदा आरोपीला दिला गेला पाहिजे. तसेच, उपलब्ध पुराव्यावरून दोन परस्पर मत निर्माण होत असतील तर आरोपीच्या बाजूने झुकणारे मत अंगीकारले पाहिजे अशी कायद्याची व्यापक संकल्पना आहे.

७. सदर खटल्यामधे अभियोगपक्षाने पंच साक्षीदार विकास हरिचंद्र भिवगडे यांची सा.क्र.१ म्हणून नि.क्र.१४ खाली साक्ष नोंदविली आहे. सा.क्र.१ हे घटनास्थळ व जप्ती पंच आहे. सा.क्र.१ विकास यांच्या मौखिक पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर साक्षीदाराने घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील त्यांची स्वाक्षरी (नि.क्र.१६) मान्य केली आहे परंतु त्यांना त्यातील मजकूर माहित नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. सदर पंच साक्षीदार हे स्वतंत्र व्यक्ती आहे, त्यामुळे त्यांचा आरोपीशी कुठलाही संबंध नाही व त्यामुळे त्यांनी आरोपीविरुद्ध किंवा आरोपीच्या बाजूने साक्ष देण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर आलेले नाही. तसेच, पंच साक्षीदार अभियोगपक्षांस फितूर झाला त्यामुळे अभियोगपक्षाने उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. सरकारतर्फे विचारण्यात आलेल्या उलटतपासासदृश प्रश्नांचे उत्तर देताना साक्षीदाराने सर्व सुचक प्रश्नांना नाकारले. आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यास आरोपीच्या वकिलांनी नकार दिला.

८. जप्ती पंचनामा पंच साक्षीदारामार्फत सिध्द न होणे ही महत्वाची त्रुटी प्रकरणात आहे. प्रकरणात सी. ए. अहवाल दाखल नसल्यामुळे आरोपीचे ताब्यातुन जप्त केलेला पदार्थ दारुच आहे हे देखील अभियोगपक्षाने सबळ पुरावा देवुन सिध्द केलेले नाही. त्यामुळे अभिलेखावर असलेला पुरावा हा आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यास पुरेसा

नाही. त्यामुळे आरोपी हा संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरतो. परिणामी, अभियोगपक्षाने सदर खटला आरोपी विरोधात निःसंशयपणे शाबीत केला असा निष्कर्ष काढता येणार नाही. सबब, वरील विवेचनावरून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे. सबब, वरील बाबीच्या विवेचनेवरून मी मुद्दा क्र.२ करिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) आरोपी **राकेश बाळकृष्ण बोंदरे**, याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम मधील कलम ६५(ई) मधील गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ नुसार रक्कम रु.१५,०००/– चे नव्याने जामिन कतबा व वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

स्वा/–
**( एन.के. वानखडे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा.

दिनांक – ०२.०५.२०२६

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 02.05.2026 |
| Order dictated on | : | 02.05.2026 |
| Transcription ready on | : | 02.05.2026 |
| Order checked and signed on | : | 02.05.2026 |

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File are same word to word as per original judgment.

Name of Steno :- T. J. Shende (Grade-III)